महाराष्ट्र शासन

# शासकीय विधी महाविद्यालय

'ए' रोड , चर्चगेट , मुंबई - ४०० ०२०.

दूरध्वनी -०२२ -२२०४१७०७ ,२२०४१७०८ website -principalglcmumbai.com Email -principal@glcmumbai .com

जावक क्रं/ शाविम/आस्था/ २०२६/ 8012 दिनांक - १/९/२०२६

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता वसतिगृह प्रवेशाबाबत.

शासकीय विधी महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेशित विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग यांनी www.hosteladmission.com या संकेतस्थळावर दिनांक २१/०८/२०२६ ते ३१/०८/२०२६ या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी लिंक उपलब्ध करून दिलेली होती. महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रीया सूरू असल्याने सदर अर्ज ऑनलाईन प्रमणालीवर भरण्याची मुदत दिनांक ५/९/२०२६ पर्यत वाढवून देण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या शासन निर्णय/सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून, त्यामध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत. तसेच, वसतिगृह प्रवेशासाठी सर्व आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत सादर करावा.

दिनांक ५/९/२०२६ नंतर सदर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग यांच्या कार्यालयाकडून बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे विहित मुदतीनंतर कोणत्याही विद्यार्थ्याचा अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

A A Vaidya 01/09/26

( डॉ. अस्मिता वैद्य )

प्राचार्य

शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई

प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'अ' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०